दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
● वर्ष १६ वे ● अंक २५२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.७ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## अवजड वाहनाला झालेल्या अपघातात १ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाहन परवाना नसताना सुद्धा ताब्यातील अवजड वाहन बेदरकारपणे चालवून त्यामुळे वाहनावरील ताबा सुटल्याने सदर वाहनाला झालेल्या अपघातात वाहन चालकाला मृत्यू झाला आहे. तर त्याचा सहकारी जखमी झाला आहे.

पनवेल जवळील कर्नाळा खिंडीतील तलावाजवळून आपल्या ताब्यातील अवजड वाहन घेवून लक्ष्मण फुलावरे (४०) रा.सोमटणे फाटा, हा चालला असताना त्याचा वाहनावरील ताबा सुटल्याने वाहनाला अपघात होवून या अपघातात तो स्वतः गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. तर त्याचा सहकारी प्रभाकर थोरात (५० रा.रामराज) हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# ही तर माझ्यासाठी तिर्थयात्रा : राष्ट्रपती रामनाथ कोविंद

## राष्ट्रपतींची दुर्गराज रायगडास भेट हा ऐतिहासिक क्षण : छत्रपती संभाजी राजे





**दै.रायगड नगरी । रवि शिंदे**

**महाड : विसाव्या शतकात गांधीजींनी स्थापन केलेले हिंद स्वराज्य हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्यापासून प्रेरित होते. किल्ले रायगडाला भेट देणे हे प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. आज किल्ले रायगडाची केलेली यात्रा मी तीर्थक्षेत्र मानतो. किल्ले रायगडावर येऊन मला खूप आनंद झाला आहे. खासदार संभाजीराजे छत्रपती यांचे आभार. ज्यांनी मला येथे येण्यासाठी निमंत्रित केले असे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आपल्या अभिभाषणात नमूद केले.**

यावेळी खासदार संभाजीराजे छत्रपती म्हणाले की दुर्गराज रायगड येथे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी भेट दिली ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची आणि गौरावास्पद बाब आहे. रायगड किल्ल्यावरील सुरु असलेले संवर्धन आणि जतन तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यासाठी आपण यावे अशी आम्ही त्यांना विनंती केली होती. त्यास मान देत ते आज किल्ले रायगडावर आले. हा ऐतिहासिक क्षण म्हणावा लागेल. या पुर्वीच्या देखील पंतप्रधान, राष्ट्रपती यांनी दुर्गराज रायगडला भेटी दिल्या आहेत.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी रायगड किल्ल्याचे कशा प्रकारे संवर्धन आणि जतन केले जात आहे त्याचे प्रेझेंटेशन पाहिले. त्यानंतर त्यांनी होळीच्या माळावरील शिवरायांचे दर्शन घेऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीस अभिवादन केले. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करण्यासाठी दुर्गराज किल्ले रायगडावर देशाचे राष्ट्रपती डॉ. रामनाथ कोविंद आज नियोजित वेळी दुपारी १२ वाजता भारतीय वायूसेनेच्या हेलिकॉप्टरने पाचाड येथे दाखल झाले यानंतर ते रायगड रोपवेनी रायगडावर गेले.

यावेळी त्यांचे स्वागत महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, रायगडच्या पालकमंत्री



आदिती तटकरे, रायगड विकासप्राधिकरणाचे अध्यक्ष खा.छत्रपती संभाजी राजे, खासदार सुनिल तटकरे, आमदार भरतशेठ गोगावले, महाड पंचायत समिती सभापती सिद्धी खांबे आदीनी त्यांचे स्वागत केले.

दरम्यान राष्ट्रपतीचे हेलिकॉप्टर उतरण्याच्या पाचाड या ठिकाणी पाच हेलिपॅड बनविण्यात आली होती. रायगडावर होळीच्या माळावर गोल्फकार तैनात ठेवण्यात आली होती. त्याद्वारे राष्ट्रपती शिव समाधीस्थळी जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेवून राजसदरेवर महाराजांना अभिवादन केले. रायगड भेटीनंतर राष्ट्रपती रामनाथ कोविंद मुंबईला रवाना झाले.

राष्ट्रपतीच्या सुरक्षेकरिता गड परिसर चोख पोलिस बंदोबस्तासह गडावर एस.आय.टी. आणि पाचशे पोलिस कर्मचारी अधिकारी तैनात होते. राष्ट्रपतीच्या रायगड भेटीसाठी रायगडावर दूरदर्शन आणि काही वृत्त वाहिनी प्रतिनिधी वगळता कोणत्याही वृत्त अथवा वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधींना गडावर अथवा गड परिसरात प्रवेश देण्यात आला नव्हता. मात्र काल सांयकाळी अधिस्विकृती प्रतिनिधीना वार्तांकन करण्याची परवानगी देण्यात आली होती. स्थानिक पत्रकारांना या दौऱ्या पासून वंचित रहावे लागल्याने त्यांच्यात नाराजीचा सूर दिसून आला.

### सदिच्छा भेट...



पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कादबाने यांची पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे जेष्ठ सल्लागार सुनील पोतदार, जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील, खजिनदार सुधीर पाटील, पत्रकार सुभाष वाघपंजे यांनी सदिच्छा भेट घेवून शुभेच्छा दिल्या.



खांदेश्वर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुभाष कोकाटे यांची पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे जेष्ठ सल्लागार सुनील पोतदार, जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील, खजिनदार सुधीर पाटील, पत्रकार सुभाष वाघपंजे व मा.पोलीस अधिकारी मोरबाळे यांनी सदिच्छा भेट घेवून शुभेच्छा दिल्या.

## मोठी जुईमध्ये भटक्या कुत्र्याच्या दंशाने मुलीचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात सध्या भटक्या कुत्र्यांची संख्या बळावली आहे.त्यात मोठी जुई गावातील २२ रहिवाशांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. माई पाटील या चिमुकल्या मुलीला चावलेल्या कुत्र्यामुळे तिचा उपचारा दरम्यान रुग्णालयात मृत्यू झाल्याची दुदैवी घटना नुकतीच घडली आहे.त्यामुळे कुत्र्यांच्या उच्छादामुळे मोठीजुई गावातील रहिवाशी सध्या भिंतीच्या सावटाखाली आपले जीवन जगत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



उरण तालुक्यात भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. उरण शहर तसेच गावोगावच्या चिकन दुकानात, गल्लोगल्ली भटकणारी कुत्री ही त्या त्या परिसरातील रहिवाशांना चावा घेत असल्याच्या बातम्या या अगोदर ऐकण्यास मिळाल्या आहेत. अशा भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याने रानसई गावातील रविंद्र शिंगवा (१५) व धर्मी आयत्या दोरे (५२) या दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली होती. अशा भटक्या कुत्र्यांची नसबंदी किंवा संख्या कमी करण्यासाठी प्रशासन, वैद्यकीय विभाग असमर्थ ठरत आहे. त्यामुळे गावोगावच्या चिकन दुकानात कोंबडीचे मांस खाणारे कुत्रे हे सर्रास रहिवाशांवर हल्ला चढवत असल्याच्या बातम्या ऐकण्यास मिळत आहेत.

मोठी जुई गावात उच्छाद मांडणाऱ्या भटक्या कुत्र्यांनी २२ रहिवाशांना चावा घेतल्याची माहिती पुढे येत आहे.त्यात माई पाटील या चिमुकल्या मुलीला चाललेल्या कुत्र्यामुळे तिचा उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली आहे. माई या चिमुकल्या मुलीनी रुग्णालयात वीस दिवस मुत्यूशी झुंज दिली. परंतु उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला. त्यामुळे मोठीजुई गावातील रहिवाशी अशा कुत्र्यांच्या दहशतीमुळे भिंतीच्या सावटाखाली वावरत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद उरण पंचायत समिती, यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी मोठीजुईचे रहिवाशी करीत आहेत.

## नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रासह उपकेंद्रात कर्मचाऱ्यांची अकरा पदे रिक्त

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

जिल्ह्यातील महत्वाच्या व मध्यवर्ती अशा नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात व या केंद्रांतर्गत असलेल्या उपकेंद्रात एक वैद्यकिय अधिकाऱ्यासह सुमारे ११ कर्मचाऱ्यांची विविध पदे रिक्त आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने पदे रिक्त असूनही मोठा कालावधी उलटूनही ही पदे जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेकडून भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत आहे. याशिवाय अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे नागरिकांना वेळेत आरोग्य सेवा देण्यात अडचणही येत आहे. त्यामुळे नागरिकांतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई गोवा महामार्गावर सातत्याने घडणाऱ्या अपघातांमुळे रुग्णांना किमान प्राथमिक उपचार तरी वेळेत मिळण्यासाठी नागोठणे हे महत्वाचे प्राथमिक आरोग्य केंद्र समजले जाते. अपघातग्रस्त रुग्णांबरोबरच येथे दररोज उपचारासाठी येणाऱ्या बाह्य रुग्णांची संख्याही खूप मोठी आहे. याशिवाय सध्या कोविड १९ च्या लसीकरणाचे कामही नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रासह सर्व उपकेंद्रात सुरु आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे नागरिकांना आरोग्य सेवा देण्यात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

उपलब्ध माहितीनुसार नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात सद्य स्थितीत दोन पैकी एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. येथील कनिष्ठ सहाय्यक पदाची एकमेव जागा रिक्त आहे. तर नागोठणे आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या सात उपकेंद्रातील महिला आरोग्य सेविकांची (एएनएम) केवळ ३ पदे भरलेली असून मेढा, पळस, ऐनघर व खांब या उपकेंद्रातील महिला आरोग्य सेविकेंची चार पदे रिक्त आहेत. तर पुरुष आरोग्य सेवकांचे (एमपीडब्लू) ६ पैकी केवळ दोन पदे भरलेली असून ४ उपकेंद्रातील पदे रिक्त आहेत. याशिवाय प्र.वै. अधिकारीची एक जागा रिक्त आहेत.

.../२

## राज्यात कोरोनाची आरटीपीसीआर चाचणी ३५० रुपयांत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

डोंबिवली, पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये ओमायक्रॉनचे रुग्ण सापडल्यानंतर आज मुंबईत आणखी दोन रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे राज्यातील एकूण रुग्णांचा आकडा १० वर गेला आहे. यातच आता राज्यात खासगी प्रयोगशाळांमध्ये करण्यात येणाऱ्या कोरोना चाचण्यांचे दर पुन्हा एकदा सुधारित करण्यात आले आहेत. कोरोना निदानासाठी करण्यात येणाऱ्या आरटीपीसीआर चाचणीसाठी ३५० रुपये आकारण्यात येणार आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आज दिली. यासंदर्भात आरोग्य विभागाने शासन निर्णय देखील जाहीर केला आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव गेल्या वर्षापासून जाणवत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने खासगी प्रयोगशाळांमध्ये करण्यात येणाऱ्या कोरोना चाचणीचे दर सातत्याने निश्चित करण्यात येत असून आतापर्यंत किमान पाच ते सहा वेळा या चाचण्यांच्या दरात सुधारणा केली आहे. आता नव्या सुधारित दरानुसार केवळ ३५० रुपयांत चाचणी करणे खासगी प्रयोगशाळांना बंधनकारक असल्याचे राजेश टोपे यांनी सांगितले.

शासन निर्णयानुसार आता कोरोना चाचण्यांसाठी ३५०, ५०० आणि ७०० रुपये दर निश्चित करण्यात आले आहेत. संकलन केंद्रावरुन नमूना घेवून त्याची वाहतूक आणि अहवाल देणे या सर्व बाबींसाठी रुग्णाकडून ३५० रुपये आकारले जातील. रुग्णालय, कोविड केअर सेंटर, कॉरंटाईन सेंटर मधील प्रयोगशाळा येथून नमूना तपासणी आणि अहवाल यासाठी ५०० रुपये तर रुग्णाच्या निवासस्थानावरुन नमूना घेवून त्याचा अहवाल देणे यासाठी ७०० रुपये आकारण्यात येणार आहेत.

## बेकायदेशीररित्या वाहनांची विक्री करणारी टोळी गजाआड ; ९ वाहने हस्तगत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अपघात झालेल्या वाहनांचे रजिस्टर नंबर आणि इंजिन नंबर बदलून त्यानंतर सदर वाहने खरी असल्याचे भासवून त्याची बिनदिक्कतपणे बाजारात विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून जवळपास १ कोटी १५ लाख ५० हजार रुपये किंमतीची ९ वाहने हस्तगत केल्याने अशा प्रकारे वाहन खरेदी व विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

दवलसाब हुसेनसाब काला उर्फ समीर वय ३६ राहणार, कोपरखैरणे, फुरखान मजिद शेख वय ४५ राहणार बांद्रा आणि दिनेश उमाशकर गुप्ता वय वय ३५ राहणार घणसोली असे पकडलेल्या आरोपीचे नावे आहेत. हे तिन्ही आरोपी अपघातात नुकसान झालेल्या वाहनांची चोरी करून, वाहना वरील रजिस्टर नंबर तसेच चेसी नंबराची बदली करून वाहने खरी भासवून वाहनांची खुल्या बाजारात खुले आम विक्री करत असे, अश्या गुन्ह्याची नवी मुबई हद्दीत मोठया प्रमाणात वाढ झाली होती, असा गुन्हा देखील रबाळे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता, त्या नुसार अश्या गुन्ह्याची समांतर तपासणी गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे व त्यांचे पथक हे तपास करत असताना त्या सोबत पोलीस उननिरीक्षक वैभव रोंगे आणि त्यांचे पथक तपास करत असताना काही तांत्रिक बाबींच्या आधारानुसार आरोपी दवलसाब हुसेनसाब काला उर्फ समीर वय ३६ याला अटक

.../२

# जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्था यांच्या पुढाकाराने आयोजित मोफत डोळ्यांची तपासणी शिबिर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जे.एम.म्हात्रे चॅरीटेबल संस्था यांच्या पुढाकाराने नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, नवदृष्टी सेवा संस्था यांच्या माध्यमातून साइट सेव्हर्स इंडिया यांच्या राही या उपक्रमाअंतर्गत संपूर्ण भारतामध्ये जड वाहतूक करणाऱ्या चालकांच्या साठी नॅशनल ट्रकर्स प्रोग्राम च्या अंतर्गत कोपर, तालुका उरण येथे अवजड वाहन चालकांसाठी मोफत डोळ्यांची तपासणी शिबिर आयोजित केले होते.


मा.गोडसे साहेब यांचे कोर्ट

अॅड.स्वप्निल अरविंद उपाध्ये, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५९८/२०२१
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्रीमती.विलासिनी हरीश परमार
वय : ६७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) कुमारी. हिना हरीश परमार
वय : २६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
दोघीही रा.ब्लॉक नं.१८, विनायक को.ऑप.हौ. सोसायटी, म्युनिसिपल ग्राऊंडजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ यांचे वडील कै.हरीश बाबुभाई परमार यांचे निधन पनवेल येथे दि.२९/०४/१९९८ रोजी झाले आहे. कै.हरीश बाबुभाई परमार यांची आई कै.मंगळाबेन बाबुभाई परमार यांचे सन १९७५ चे सुमारास पनवेल येथे देहावसान झाले आहे. कै.हरीश बाबुभाई परमार यांना हिंदू वारसा कायद्यानुसार अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.हरीश बाबुभाई परमार यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**

**अ) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील सीटीएस क्रं.४३२-ए वरील विनायक को.ऑप.हौ.सोसायटी लि.मधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्रं.०६, क्षेत्र अदमासे ६०० चौरस फुट बिल्टअप अशा वर्णनाची मिळकत.**

**ब) स्टेट बँक ऑफ इंडियाचे फोलिओ क्रं.१६३९८९३ असलेले ५०० शेअर्स**

सदरहू मिळकती ह्या कै.हरीश बाबुभाई परमार यांच्या स्वकष्टार्जित मिळकत होत्या व आहेत.

वर नमूद श्रीमती.विलासिनी हरीश परमार व कुमारी.हिना हरीश परमार ह्या कै.हरीश बाबुभाई परमार यांच्या कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.विलासिनी हरीश परमार व कुमारी.हिना हरीश परमार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि त्या जर कै.हरीश बाबुभाई परमार यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०६/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

सर्व व्यक्तीस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : तळेगांव, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत खालील वर्णन केलेल्या सदर मिळकतीचे मालकांकडून कायमस्वरुपी खरेदी करारा अन्वये खालील वर्णन केलेली मिळकत मधील खालील नमूद व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या हक्क हितसंबंधासहीत विकत घेण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळेगांव, ता.खालापूर, जि.रायगड**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे क्रं. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| **कै.लडकू रामजी कडपे-मयत तर्फे कायदेशीर वारस**<br>१.अ) श्रीमती.सुमन रघुनाथ घडगे,<br>१.ब) निरा दशरथ लदगे,<br>१.क) श्रीमती.जनाबाई अंकुश तांडेल<br>१.ड) रामचंद्र लडकू पाटील<br>१.इ) गोविंद लडकू पाटील<br>१.फ) काशिनाथ लडकू पाटील<br>२) श्री.दत्तात्रेय बाळू कडपे उर्फ पाटील<br>३) श्री.अनंता बाळू कडपे उर्फ पाटील<br>४) श्री.महादेव बाळू कडपे उर्फ पाटील<br>५) श्री.अशोक बाळू कडपे उर्फ पाटील<br>६) श्री.वामन बाळू कडपे उर्फ पाटील<br>७) अनुबाई महादेव घरत<br>८) रेणूका कृष्णा पिंगळे<br>९) साधना शंकर जांभाळे<br>१०) रेश्मा उर्फ कल्पना रमेश माळी<br>११) गणेश लक्ष्मण कडपे उर्फ पाटील<br>१२) श्री.निलेश लक्ष्मण कडपे उर्फ पाटील<br>१३) श्री.उमेश लक्ष्मण कडपे<br>१४) निर्मला लक्ष्मण कडपे उर्फ पाटील<br>१५) श्रीमती.मनिषा मंगेश तळपे | ५२ | १ | २.४६.०० यापैकी २-०६-०० गुंठे | ३३.४५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीस यापुढे सोयीसाठी नोटीशीमध्ये 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आलेले आहे.

तरी या जाहीर नोटीशीद्वारे सर्व व्यक्तीस कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कुणाीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुणाचाही कसल्याही प्रकारचा कुठल्याही स्वरुपाचा करार, समझोता करार, बक्षिस, दान, गहाण, वहिवाट, तारण, वारसा हक्क, बोजा इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे खालील नमूद पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह व आपले हक्क हितसंबंधाचे स्पष्टीकरणासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने आपल्या हरकती पोच कराव्यात.

सदर १५ दिवसांचे कालावधीत कुणीही कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकतीबाबत आमचे अशिल सदर नोटीशीमध्ये नमूद केल्याप्रमाणे खरेदी करार पूर्ण करतील व सदर १५ दिवसांचे कालावधीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

दि.०७/१२/२०२१
पनवेल

**सही/-**
**ॲड.रोशनी कुंडलिक खुटले**
**संपर्कासाठी पत्ता : पनवेल**
**मोबा नं.८२९१२१०००१**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक १) श्री.कुरियन झकारिया, २) प्रमिला लक्ष्मण साळुंके, ३) राजी कुरियन, ४) लक्ष्मण एच. साळुंके, राहणार मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्श्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्रं. | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ९२ | २ | 00.११.00 | १.७५ |
| १ | १ | १०५ | १ | 00.१८.00 | ३.८१ |

तरी वर नमूद जमिनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबत जमीन मालक १) श्री.कुरीयन झकारिया, २) प्रमिला लक्ष्मण साळुंके, ३) राजी कुरीयन, ४) लक्ष्मण एच. साळुंके यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/१२/२०२१

**सही/-**
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्रं.२८, सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**



मा.गोडसे साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.विशाल अनंत मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७९८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्री.सुरेश गणपत भोईर
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
२) श्री.भगवान गणपत भोईर
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.रामचंद्र गणपत भोईर
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
४) श्रीमती.ताराबाई गणपत भोईर
वय :         वर्षे, धंदा : घरकाम
सर्व रा.मु.पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील म्हणजेच अर्जदार क्र.४ यांचे पती गणपत उंदीर भोईर हे दि.०१/१०/२०२१ रोजी मौजे : न्हावे, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. सदर मयत गणपत उंदीर भोईर यांच्या सामाईक मालकीची मौजे : न्हावे, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नंबर | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| न्हावे-३७ | अ | ५४४ | 0-0९-८ |

वर नमूद संपादीत मिळकतींचे संपादनापोटी मिळणारे लाभ मिळण्याकरिता अर्जदारांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत गणपत उंदीर भोईर यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशाा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०६ माहे १२ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# वयस्कर पर्यटकांची संख्या वाढल्याशिवाय पर्यटनाला गती अशक्य ; ई- रिक्षाच घडवू शकते पर्यटन क्रांती

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : मागील काही वर्षांपासून माथेरान हे केवळ एक दिवसीय पर्यटनस्थळ बनल्याने स्थानिकांच्या व्यवसायावर मोठया प्रमाणात परिणाम झालेला दिसून येत आहे त्यामुळे स्थानिकांना अनेक अडचणींना तोंड देताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.



राज्यातील स्वस्त आणि मुंबई पुण्यापासून जरी अगदी जवळचे हे ठिकाण असले तरीसुद्धा सुट्ट्यांच्या हंगामा व्यतिरिक्त अन्य दिवशी पर्यटक हे इथे सुरक्षित आणि स्वस्तात वाहतुकीची व्यवस्था नसल्याने एक दिवसांत आपला मुक्काम हलवतात. पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र असल्या कारणाने इथे अंतर्गत प्रवासासाठी मोटार वाहनांना बंदी आहे. घोडा आणि हातरीक्षा याचा आधार घेऊन पर्यटकांना मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी पासून गावात येताना खूपच खर्चिक बाब ठरते. वयस्कर पर्यटकांना त्याचप्रमाणे दिव्यांग, अपंग, यांना सुध्दा ह्या स्थळाचा आनंद उपभोगण्याची प्रबळ इच्छा असताना देखील केवळ वाहतुकीची समस्या असल्यामुळे त्यांना या सुंदर स्थळापासून मुकावे लागत आहे.माथेरानला वयस्कर मंडळी आल्याशिवाय त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना दोन दिवस तरी इथे राहता येऊ शकत नाही. त्यांनाही इथल्या पर्यटनस्थळाचा मनमुराद आनंद घेता यावा यासाठी स्वस्त दरात वाहतुकीची एकमेव सुविधा म्हणजे अर्थातच ई- रिक्षा हाच पर्याय उपलब्ध होऊ शकतो. येथील श्रमिक हातरीक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदेंनी मागील दहा वर्षांपासून इथे शासनाने ई- रिक्षा सुरू करून वयस्कर पर्यटकांना तसेच दिव्यांगांना शालेय विद्यार्थ्यांना सहज प्रवास करता यावा यासाठी पाठपुरावा केला आहे आणि लवकरच ही समस्या प्रगती पथावर आहे.

अल्पावधीतच इथले संपूर्ण रस्ते एमएमआरडीए च्या माध्यमातून क्ले पेव्हर ब्लॉक मध्ये करण्यात येत आहेत त्यामुळे ई- रिक्षाची चाचणी सुद्धा लवकरच करण्यात येणार असल्याचे गोपनीय सूत्रांकडून समजते. पर्यावरण पूरक ई- रिक्षा सुरू झाल्यास खऱ्या अर्थाने इथे जेष्ठ पर्यटकांची संख्या वाढणार आहे यातून आपसूकच निदान दोन दिवस तरी पर्यटक आपल्या लवाजम्यासह मुक्कामी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. धूळ विरहित रस्त्यावरून आबालवृद्ध मंडळी मनमोकळेपणे बाजारात खरेदी करू शकतात. याच रस्त्यांमुळे सध्या ज्याप्रमाणे जागोजागी दुर्गंधीचे साम्राज्य पहावयास मिळते ते संपुष्टात येणार आहे. याठिकाणी जोपर्यंत वयस्कर पर्यटकांची संख्या वाढत नाही तोपर्यंत इथल्या पर्यटनाला गती मिळणे अशक्य असल्याचे पर्यटकांसह सुज्ञ नागरिकांमधून बोलले जात आहे.त्यामुळे ई- रिक्षाच इथे पर्यटन क्रांती घडवू शकते.

> चार दशकांपूर्वी आमचे आईवडील याठिकाणी येऊन गेले आहेत. इथला निसर्ग आजही त्यांना आकर्षित करतो आहे. इथली स्वच्छ प्रदूषण मुक्त हवा आणि शांत वा-तावरण हे अन्य कोणत्याही ठिकाणी अनुभवयास मिळत नाही. आजही त्यांना माथेरानला यायची खूप इच्छा आहे परंतु इथली वाहतूक व्यवस्था ही खिशाला न परवडणारी आहे. दिल्ली वगैरे ठिकाणी ज्याप्रमाणे बॅटरी रिक्षा चालतात त्या इथेही सुरू केल्यास आमच्या जेष्ठ आईवडिलांना पुन्हा एकदा घेऊन येऊ शकतो.
>
> **औदुंबर सोनटक्के, पर्यटक मुंबई**







प्रोसेस जमा रु.५०/-

ॲड.समाधान काशिद, कामोठे
अर्जदारातर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.१५२१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२२

मीना अमेय यादव आणि इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी कै.अमेय ईश्वर यादव हे दि.२२/०५/२०२१ रोजी सदनिका क्रं.१०१, १ ला मजला, ए विंग, गंगाधर टॉवर, प्लॉट नं.३३, सेक्टर नं.९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका क्रं.१०१, पहिला मजला, ए विंग, गंगाधर टॉवर, प्लॉट नं.३३, सेक्टर नं.९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड. त्याचे क्षेत्रफळ ६०.२२ चौ.मी. बिल्टअप यामध्ये ५० टक्के हिस्सा**

कै.अमेय ईश्वर यादव यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार यांनी वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज केला आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वील अर्जदार व सामनेवाले यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख ६/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## SUNDARAM TOWER CO OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.

REG.NO.NBOM/CIDCO/HSG(TC)/3951/JTR/YEAR 2011-2012

**NOTICE FOR TENDER**

Sundaram Tower CHS Ltd. has invited tender for Paiting and Repair work at Kamothe, Sec-19, Plot No.84, Kamothe, Navi Mumbai-410209

Bidders can collect the tender form Society office by paying Rs.2000/-. DD/Payble in favour of : Sundaram Tower CHS Ltd.

Email : mc@sundaramtower.com
Mobile : 7045705714 / 9969662820

Sd/-
Chairman/Secretary
Sundaram Tower CHS Ltd



मे.अस्मार सो यांचे कोर्टात

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.शिल्पा पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरक्ति जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२२

श्रीमती.शुभांगी मोहन पाटील
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.रोडपाली, घर नं.६०, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतसे या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कु.कार्तिक मोहन पाटील व कु.क्रिशा मोहन पाटील, रा.मु.रोडपाली, घर नं.६०, ता.पनवेल, जि.रायगड राहत असून ती अज्ञान असून वरील अर्जदार यांचे व अज्ञान यांचा हिस्सा असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रोडपाली (आंबेतखार), ता.पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| रोडपाली | ८४ | ४३७ | १२५ | 0-११-१ | १.५६ |
| | | ४३७ | १४८ | 0-५८-२ | ६.६२ |
| रोडपाली | ६४ | ३९६ | 0 | 0-१२-४ | २.६९ |
| | | | | 0-०४-५ | |
| रोडपाली | ६४ | ४१४ | १ | 0-११-६ | २.१८ |
| रोडपाली | १७१ | ३३ | १ | 0-१२-0 | |

असून श्रीमती.शुभांगी मोहन पाटील, हिला कु.कार्तिक मोहन पाटील व कु.क्रिशा मोहन पाटील हिचे पालन कर्ती म्हणून नेमणूक करून मिळावी तसेच अज्ञानांचा पालनकर्ती श्रीमती.शुभांगी मोहन पाटील अज्ञानांची आई हिला अज्ञानांची स्थावर मिळकत विक्री करण्याबाबत परवानगी मिळण्याकरिता अर्ज केला आहे. सदरहू अर्जदार या कु.कार्तिक मोहन पाटील व कु.क्रिशा मोहन पाटील यांची अज्ञान पालन कर्ता आई नाही असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीस प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती. शुभांगी मोहन पाटील यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि त्यांना कुमारी कु.कार्तिक मोहन पाटील याचा व कु.क्रिशा मोहन पाटील याचे हिश्श्यास येणाऱ्या मिळकतीचे नैसर्गिक पालनकर्ता त्याच्या हिश्श्याची मिळकत विक्री करता येईल तसेच त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**अति.जिल्हा.न्याया, पनवेल**



Adv.Meghana Nimbalkar

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D)
Sonawane saheb, PANVEL AT PANVEL
M.A. No.1834 /2021
Exh No. 7/D
Next Date : 3/2/2022

Mr. Umesh Anand Amarale
Age; 46 Years, Occupation: Service
Residing at: A-02, Vaibhavshali C.H.S,
Plot No.5. Sec-11, Kharghar-410210 — Applicants
v/s
1. Mrs. Vaishali Anand Amarale
Age: 66 years. Occupation : Nil
Residing at: A-02, Vaibhavshali C.H.S,
Plot No.5, Sec-11, Kharghar-410210
2. Mrs. Rupali Mahendra Deshmukh
Age: 43 years, Occupation : Nil
Residing at: 103/104, Rajratna Park,
Brahmand, Thane (W)-400607 — Opponents

That Late Shree. Anand Narayan Amarale was the father of Applicant & Opponent no.2 and Husband of Opponent no. 1 who expired on 11/04/2019 at Mumbai, Maharashtra. The Property Description Standing in The Name of Deceased is Attached Herewith.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

Name Of the Property Holder : Late Shree. Anand Narayan Amarale

Flat No. A-02, Vaibhavshali C.H.S, Plot No. 5. Sector -11, Kharghar- 410210, Taluka- Panvel, District- Raigad

Agreement Value Rs. 4,68,000/- (Rupees Four Lakh Sixty Eight Thousand Only)

Whereas the above-named applicant has filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel

You the members of public are hereby given notice to appear in the court of civil judge (S.D) Panvel in person or by pleader duly instructed and to file your say / objections if any notice within 30 days from the date of publication of public notice, failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 06 Day of 12/2021

sd/-
Jr.Cleark
Civil Judge
(S.D.) Panvel

Court Seal

sd/-
Asst. Superintendent
Civil Judge
(S.D.) Panvel


पृष्ठ क्र.१ वरुन...

## नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रासह उपकेंद्रात कर्मचाऱ्यांची अकरा पदे रिक्त

एवढ्या मोठ्या संख्येने उपकेंद्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांना अनेकवेळा कामासाठी उपकेंद्रात जावे लागत आहे. त्याचा परिणाम नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवेवर होत असल्याने रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

रिक्त पदांच्या जागी नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु असून ऑक्टोबर, २०२१ पर्यंत ही प्रक्रिया जिल्हा आरोग्य विभागाकडून पूर्ण करण्यात येईल असे डॉ. सुधाकर मोरे यांनी यापूर्वी सप्टेंबर २०२१ च्या पहिल्या आठवड्यात सांगितले होते. मात्र डिसेंबर महिना सुरु झाला तरी नागोठणे प्रा.आ. केंद्रातील ११ जागा अद्याप रिक्त असल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

## बेकायदेशीररित्या वाहनांची विक्री करणारी टोळी गजाआड ; ९ वाहने हस्तगत

केली. या आरोपिकडून इको आणि इनोव्हाकार पोलिसांनी जप्त केली. या वाहनांची तपासणी केली असता मूळ चेसी नंबर आणि इंजिन नंबर खोडून बनावट चेसी नंबर आणि इंजिन नंबर पोलिसांना आढळून आली आहे. तसेच इनोव्हा कारचे इसिएम सिस्टिम बदलली असल्याचे लक्षात आले. त्या नुसार अधिक तपास केला असता त्याचे साथीदार आरोपी हे अश्या प्रकारे वाहनांच्या नंबरची अदला बदल करून वाहन विक्री करत असत असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली. या आरोपीवर दिल्ली आणि उत्तरप्रदेश मध्ये गुन्हे देखील दाखल आहेत. या कामासाठी हे आरोपी मुंबई, दिल्ली आणि पुणे शहरातून वाहने चोरी करून त्यात बदल करून ही वाहने ही टोळी राज्याच्या बाहेर विकत होती ही माहिती मिळाल्यानंतर पोलीस पथकांनी आरोपींना अटक करून आरोपी कडून १ कोटी १५ लाख ५० हजार रुपयांची एकूण ९ वाहने त्यांनी जप्त केली आहेत या सर्व वाहनाचे सर्व नंबर आणि चेसी नंबर बदल्याचे पोलिसांना आढळून आले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## माथेरान मध्ये निष्ठावंत शिवसैनिकांचा वाढदिवस साजरा



**दै.रायगड नगरी । माथेरान**

अत्यंत आत्मीयतेने स्वतःला झोकून देत प्रत्येक कार्यात निस्वार्थी पणाने सहभागी होऊन हाकेला धावणारा, पक्षाच्या कार्यात झेंडा खांद्यावर घेऊन एक वेगळाच रुबाब साकारणारा,प्रसाद भाईंवर निष्ठेने प्रेम करणारा माथेरान मुस्लिम मोहल्ला विभागाचे कट्टर शिवसैनिक, जनसम्पर्क कार्यालयात येणाऱ्या जाणाऱ्याची आस्थेने विचारपूस करून त्यांना सेवा देणारा, ज्याची ख्याती शिवसेनेचा प्रचार आणि प्रसार वेगवेगळ्या लूक मधून कर्जत तालुक्यातच नव्हे तर नाईट क्रिकेट स्पर्धेच्या वेळी युट्युबच्या माध्यमातून सर्व जगाच्या कानाकोपऱ्यात पोचवणारा असा जीवाला जीव देणारा एकनिष्ठ मुस्लिम मावळा सतत हसतमुख असा आरिफ उर्फ समीर पन्हाळकर यांचा वाढदिवस शिवसेना जनसंपर्क कार्यालयात आनंददायी वातावरणात केक कापून साजरा करण्यात आला.

यावेळी तशप You planners चे गौरंग वाघेला व अंकिता तोरणे यांच्या माध्यमातून आकर्षक अशी सजावट करण्यात आली. जनसंपर्क कार्यालयाला भगवे रूप यानिमित्ताने प्राप्त झाले होते.आपल्या पक्ष्याचा एक खंदा शिलेदार म्हणून समीर यांना शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांनी केक भरवला

यावेळी उप१शहर प्रमुख सागर पाटील, शिवसैनिक अनंत शेलार,मनोहर रांजणे, वसंत कदम, निमेश मेहता, बाळू दाभेकर, रोहित साबळे, उमेश सावंत, मिथुन कदम, गणेश कदम असंख्य शिवसैनिक, महिला आघाडीच्या सदस्या यांसह नागरिक उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवसेनेने केले अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेल येथील आंबेडकर भवनात जाऊन पनवेल शिवसेनेच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळेस शिवसेनेच पदाधिकारी प्रविण जाधव (शहर संघटक), अनिल कुरघोडे (उपशहर संघटक), सुजन मुसलोंडकर (विभाग प्रमुख), प्रविण परमार, अमित माळी, श्रीमती रुही सुर्वे (शहर संपर्क संघटक), सौ. अर्चना कुळकर्णी (शहर संघटक), सौ. रेश्मा कुरुप (विभाग संघटक) आदी उपस्थित होते.

# मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी पाळला शब्द ; आश्वासनाच्या दुसऱ्या दिवसांपासून ‘ट्रामा सेंटर’ सुरू

## पोलीस मित्र संघटना व रायगड संघर्ष समितीच्या पहिल्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । खोपोली**

शिळफाटा येथील ‘ट्रामा सेंटर’ मागील अनेक दिवसांपासून बंद होते. पण दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी रायगड संघर्ष समिती व पोलीस मित्र संघनेने त्याबाबत उपोषण सुरू केले असता मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी त्वरित ‘ट्रामा सेंटर’ सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार बुधवार दि. १ डिसेंबर २०२१ पासून या ठिकाणी कोविड वैक्सीनेशन करीत ट्रामा सेंटर सुरू करण्यात आले आहे.



शिळफाटा येथील नागरिकांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी खोपोली नगर परिषदेकडून लाखो रूपये खर्च करून ‘ट्रामा सेंटर’ बांधण्यात आले होते. मात्र या सेंटरचा योग्य असा उपयोग नगर परिषदेकडून होत नसल्याने ते धूळखात पडले आहे. दरम्यान, जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार व पोलीस मित्र संघटना चे रायगड जिल्हा महासचिव-खलील सुर्वे,गोपीनाथ सोनवणे, समाजसेवक सतीश रावळ, माजी नगरसेवक राजू डुमणे यांनी सुभाषनगर येथे संरक्षण भिंत बांधणे, शिळफाटा येथील ट्रामा सेंटर सुरू करणे यासह विविध मागण्यांसाठी तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. रायगड संघर्ष समिती व पोलीस मित्र संघनेच्या मागण्यांबाबत तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी बैठक आयोजित केली होती. यावेळी खोपोली नगर परिषद मुख्याधिकारी अनुप दुरे, खालापूर पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांची प्रमुख उपस्थिती होती.

खोपोली नगर परिषद हद्दीतील मागण्यांबाबत मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी सकारात्मकता दर्शविली होती. त्यातील पहिला शब्द पाळत त्यांनी बुधवार दि. १ डिसेंबर २०२१ पासून शिळफाटा ट्रामा सेंटर या ठिकाणी कोविड वैक्सीनेशन करीत ट्रामा सेंटर सुरू केले आहे. मुख्याधिकारी यांनी दिला शब्द पाळल्याने रायगड संघर्ष समिती व पोलीस मित्र संघटने कडून त्यांचे आभार मानण्यात आले आहेत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शिवसेना नेत्यांनी केले अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांच्यासोबत पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे, पनवेल उप महानगरप्रमुख यतीन देशमुख, शिवसैनिक संदीप तांडेल, उप शहरप्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, प्रवीण जाधव, अविनाश गव्हाणकर, भास्कर नारायण भंडारे, सुनील पाटील सर, रणजित शेट्ये आदी पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आज ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिन म्हणजेच त्यांचा स्मृतिदिन पाळण्यात येवून त्यांना अभिवादन केले जाते. डॉ.आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे महापरिनिर्वाण (निधन) झाले होते, याच्या दुसऱ्या दिवशी ७ डिसेंबर रोजी मुंबईतील चैत्यभूमी येथे त्यांच्यावर बौद्ध धर्म पद्धतीने अंतिमसंस्कार करण्यात आले. निधनापूर्वी त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला होता, त्यांना बौद्ध लोक ’बोधिसत्व’ म्हणून मानतात.

आंबेडकर हे बौद्ध गुरु होते, यामुळे त्यांच्या पुण्यतिथीसाठी ’महापरिनिर्वाण’ हा बौद्ध संकल्पनेतील शब्द वापरण्यात आला आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्त नवीन पनवेल येथील शबरी हॉटेलच्या मागे असलेल्या जागेत त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच नवीन पनवेल येथील शिवसेनेच्या शाखेत सकाळच्या सुमारास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

यावेळी भिमप्रेरणा सांस्कृतिक केंद्र नवीन पनवेलचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे, सचिव प्रकाश कांबळे, जयद्रथ गायकवाड, ई.एस.पवार, नामदेव वाघमारे, धनंजय इंगोले, सुरेंद्र सोरटे, मुकुंद कांबळे, राजेश कांबळे, देवानंद पवार, अनिल मोहिते, शहाजी तासगावकर, शेषराव घांगळे, आर.पी.वानखेडे, राजकुमार रामटेके, सुभाष बागडे, अलका मोरे, प्रकाश बिनेदार, नितीन मोरे, मीनाक्षी गावंडे, तुळशीदास बोबडे आदी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिवादन केले.



## खांब-पालदाड मार्गावर सिमेंटने भरलेला टेम्पो खचला

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

खांब-पालदाड मार्ग अरूंदीकरणामुळे नेहमीच चर्चेचा विषय बनला आहे.तर या मार्गाचे अरूंदीकरणामुळे नेहमीच छोटे मोठे अपघातही घडत आहेत.तर आज ६ डिसें.रोजी नागोठणे येथून कपिल बिंद हे आपल्या ताब्यातील सिमेंटने भरलेला टेम्पो (एम-१२/ओजी-८४१४) देवकान्हे येथे घेऊन जात असताना चिल्हे गावाच्या हद्दीत आले असताना समोरून येणाऱ्या वाहनास साईड देत असताना रस्त्याच्या कडेला टेम्पो घेत असताना टेम्पो खचला असल्याची घटना घडली आहे.

---

पांडे साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.राकेश दिघे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज क्र.१२३७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२७/१२/२०२१

श्री.सचिन गुंडेराव पवार
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.मौजे : खारघर, फ्लॅट १ ए/६०४,
प्लॉट एफ/७२, सेक्टर १२, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल शहर महानगरपालिका — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा कु.गीतेश सचिन पवार हा दि.३०/०९/२००९ रोजी मौजे : रा.मौजे खारघर, फ्लॅट नं.१ ए /६०४, प्लॉट नं. एफ /७२, सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड झालेला आहे. अर्जदार यांचा मुलगा कु.गीतेश सचिन पवार यांच्या जन्माची नोंद होण्यासंबंधी संबंधित महानगरपालिका यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे जन्माचा दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे जन्माचा दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.६/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.पांडे सो.यांचे कोर्ट

ॲड.धनश्री भोईर
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज क्र.१२९१/२०२१
ने.ता.०७/०१/२०२२

श्री.नजीर अबुबकर साखरकर — अर्जदार

विरुद्ध

मा.मुख्याधिकारी तथा निबंधक सो.
जन्म, मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत वहाळ — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कुमारी हाफसा हानिफ साखरकर ही अर्जदार यांची नात्याने नात असून कुमारी हाफसा हानिफ साखरकर हिचा जन्म दि.१४/०७/२०२० रोजी साई हॉस्पिटल, उलवा, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेले आहे. त्याअर्थी अर्जदार श्री.नजीर अबुबकर साखरकर यांनी जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १० अन्वये कुमारी हाफसा हानिफ साखरकर हिच्या जन्म नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालयात वरील अर्जदार यांच्या अर्जाकमी पुरावा घेण्याची जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १० अन्वये कुमारी हाफसा हानिफ साखरकर हिच्या जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.०६/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

---

मा.सोनावणे सो.

ॲड.अरविंद चामले
ॲड.शुभांगी पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो, पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१७४९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०१/२०२२

कै.चंदर आंबाजी पाटील मयत तर्फे वारस
१) श्री.जनार्दन चंदर पाटील
वय : ६७ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.बाबू चंदर पाटील मयत तर्फे वारस
राधाबाई बाबू पाटील मयत तर्फे वारस
२.१) राजीव बाबू पाटील
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
३) कै.धाऊ चंदर पाटील मयत तर्फे वारस
कै.कानुबाई धाऊ पाटील मयत तर्फे वारस
३.१) बळीराम धाऊ पाटील
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती
३.२) नंदा रामदास म्हात्रे
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
४) गणपत चंदर पाटील मयत तर्फे वारस
४.१) निर्मला गणपत पाटील
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
४.२) कृष्णा गणपत पाटील मयत तर्फे वारस
४.२.१) संजली कृष्णा पाटील
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
४.२.२) श्रेयस कृष्णा पाटील
वय : १२ वर्षे, धंदा : शिक्षण
४.३) संजय गणपत पाटील (अविवाहित मयत)
४.४) प्रणिता प्रशांत घरत
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
४.५) नम्रता भरत गायकवाड
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.कोपर, गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदर प्रस्तुत अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील व २.१ ते ४.५ यांचे आजोबा कै.चंदर आंबाजी पाटील, हे दि.२९/११/२००१ रोजी मृत्यू पावले आहेत यांचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण मु.कोपर, ता.पनवेल, जि.रायगड असून ते येथील कायमचे रहिवासी होते. त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**गाव : गव्हाण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १४१ | २ | ०-२४-०० | ०.०० |
| २ | १३८ | ५ | ०-०५-८० | ०.०० |
| ३ | ११० | ० | ०-०८-०० | ०.०० |
| ४ | २३२ | ४ | ०-०९-४० | ०.०० |
| ५ | १५४ | १ | ०-१४-४० | ०.०० |
| ६ | ९७ | (८) अ | ०-२४-५० | ४.२५ |
| ७ | २५५ | ११ | ०-१०-५० | १.४४ |
| ८ | ९७ | (८) ब | ०-२०-७० | ३.४४ |

त्यांना पुढीलप्रमाणे वारसदार होते व आहेत.

| क्रं. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| | कै.चंदर आंबाजी पाटील मयत तर्फे वारस | | |
| १ | श्री.जनार्दन चंदर पाटील | ६७ | मुलगा |
| २ | श्री.बाबू चंदर पाटील मयत तर्फे वारस | | मुलगा |
| | राधाबाई बाबू पाटील मयत तर्फे वारस | | सुन |
| २.१ | राजीव बाबू पाटील | ४६ | नातू |
| ३ | धाऊ चंदर पाटील मयत तर्फे वारस | | मुलगा |
| | कानुबाई धाऊ पाटील मयत तर्फे वारस | | सुन |
| ३.१ | बळीराम धाऊ पाटील | ४३ | नातू |
| ३.२ | नंदा रामदास म्हात्रे | ५७ | सुन |
| ४ | गणपत चंदर पाटील मयत तर्फे वारस | | मुलगा |
| ४.१ | निर्मला गणपत पाटील | ६४ | नात |
| ४.२ | कृष्णा गणपत पाटील मयत तर्फे वारस | | नातू |
| ४.२.१ | संजली कृष्णा पाटील | ३४ | नात सुन |
| ४.२.२ | श्रेयस कृष्णा पाटील | १२ | पणतू |
| ४.३ | संजय गणपत पाटील (अविवाहित मयत) | | नातू |
| ४.४ | प्रणिता प्रशांत घरत | ४४ | नात |
| ४.५ | नम्रता भरत गायकवाड | ३८ | नात |

वरील प्रमाणे वडील मयत कै.चंदर आंबाजी पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/१२/२०२१
ठिकाण : पनवेल

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब यांचे कोर्टात

अर्जदाराचे वकील : सुधीर स. मेढेकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.वरिष्ठ दिवाणी न्यायालय, यांचे न्यायालय, पनवेल, जि.रायगड

दि.चौ.अर्ज क्र.१७८०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) सौ.पुजा सुधीर गोसावी
(विवाहपूर्वीचे नाव : पुजा सिताराम गोरे)
२) सौ.पल्लवी किरण गोसावी
(विवाहपूर्वीचे नाव : पल्लवी सिताराम गोरे)
३) श्री.प्रतिक सिताराम गोरे
सर्वांचा पत्ता : सदनिका क्र.२०३, ०२ रा मजला,
वैष्णवी अपार्टमेंट, प्लॉट नं.१४, सेक्टर ६ ए, कामोठे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, राज्य-महाराष्ट्र ४१०२०९ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येत आहे की, कै.सिताराम दादा गोरे हे दि.१३/१०/२००५ रोजी मौजे : डंगिरेवाडी, तालुका : मान, जिल्हा : सातारा येथे मयत झाले आहेत. वरील अर्जदार यांनी कै.सिताराम दादा गोरे, यांच्या खालील नमूद मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकामी या माननीय मे.वरिष्ठ दिवाणी न्यायालय, पनवेल, जिल्हा : रायगड यांच्याकडे अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.२०३, ०२ रा मजला, क्षेत्र २६.०२ चौ.मी. बांधीव, वैष्णवी अपार्टमेंट सह.गृह.संस्था मर्या, प्लॉट नं.१४, सेक्टर ६ ए, कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

तरी सदरचे अर्जदार हे कै.सिताराम दादा गोरे यांचे कायदेशीर वारस आहेत. या त्यांच्या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकत / हरकती द्यावयाच्या असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मा.न्यायालयात आपली हरकत / हरकती दाखल करावी.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदर कामी वारसाचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.०१/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.सोनावणे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड.सचिन केणी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

स्पे.मु.नं.४२/२०२१
नि.नं.१६/ड
ने.ता.२४/०१/२०२२

श्री.जयप्रकाश नारायण त्रिपाठी
वय : ४४ वर्षे, व्यव : धंदा
रा.फ्लॅट नं.११०४, ए-विंग, फोनिक्स हाईटस्,
प्लॉट नं.५६, सेक्टर १७, रोडपाली
कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८ — वादी

विरुद्ध

श्री.संकेश महेंद्र पुजारा
वय : ४४ वर्षे, व्यव : धंदा
र.फ्लॅट नं.१०१, पर्ल अपार्टमेंट, निर्मल
लाईफ स्टाईल, रेसिडेन्सी, मोतीनगर,
एल.बी.एस.रोड, मुलूंड वेस्ट — प्रतिवादी

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील वादी श्री.जयप्रकाश नारायण त्रिपाठी यांनी प्रतिवादी श्री.संकेश महेंद्र पुजाारा, यांच्या विरुद्ध रक्कम रुपये १६,११,४२०/- इतकी रक्कम वसुल करून मिळण्याकरिता पनवेल येथील दिवाणी न्यायालय व स्तर या न्यायालयात वसुलीचा दावा दाखल केलेला आहे.

सदरहू दाव्याचा क्र.स्पे.मु.नं.४२/२०२१ असा आहे. सदरहू स्पे.मु. नं.४२/२०२१ या दाव्याच्याकामी प्रतिवादी यांस दाव्यात नमूद केलेल्या पत्यावर नोटीस / समन्स काढले असता सदर प्रतिवादी यांना समन्स / नोटीस बजाविलेल्याचा रिपोर्ट आज रोजी पर्यंत मे.कोर्टात आलेला नाही.

तरी सदर प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, सदर स्पे.मु.नं.४२/२०२१ या दाव्याच्या सुनावणीकामी पुढील तारीख २४/०१/२०२१ अशी आहे. सदर तारखेस मे.कोर्टात या दाव्याकामी आपणास कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत हजर न झाल्यास आपणास प्रतिवादी यांस दाव्याच्या समन्स / नोटीसची बजावणी झाली असे गृहीत धरुन आपण प्रतिवादी यांच्या विरुद्ध एकतर्फी दावा सुनावणीचा आदेश केला जाईल.

आज दि.२९/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब यांचे कोर्टात

अर्जदाराचे वकील : सुधीर स. मेढेकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.वरिष्ठ दिवाणी न्यायालय, यांचे न्यायालय, पनवेल, जि.रायगड

दि.चौ.अर्ज क्र.१३१७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्रीमती.निर्मला सोपान लावंड
२) श्री.सचिन सोपान लावंड
३) शीतल सोपान लावंड
४) श्री.महेश सोपान लावंड
५) श्रीमती.अंजना विश्वनाथ लावंड
सर्वांचा पत्ता : फ्लॅट क्र.४०५, एच-विंग, ०४ था मजला, सत्यकेतू कॉम्प्लेक्स सह.गृह.संस्था मर्यादित, प्लॉट क्र.९, सेक्टर ३५,
तालुका : पनवेल, जि.रायगड, राज्य महाराष्ट्र ४१०२०९ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येत आहे की, कै.सोपान विश्वनाथ लावंड हे दि.२८/०१/२०२१ रोजी ग्रामीण रुग्णालय, तालुका : मान, जिल्हा : सातारा येथे मयत झाले आहेत. वरील अर्जदार यांनी कै.सोपान विश्वनाथ लावंड यांच्या खालील नमूद मिळकतीत संदर्भात वारस दाखला मिळणेकामी या माननीय मे.वरिष्ठ दिवाणी न्यायालय, पनवेल, जिल्हा : रायगड यांच्याकडे अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट क्र.४०५, एच-विंग, ०४ था मजला, सत्यकेतू कॉम्प्लेक्स सह.गृह.संस्था मर्यादित, प्लॉट क्र.९, सेक्टर ३५, तालुका : पनवेल, जि.रायगड, राज्य महाराष्ट्र ४१०२०९**

**क्षेत्र : ४६.६० चौ.मी.बांधीव + ५.११ चौ.मी.टेरेस**

तरी सदरचे अर्जदार हे कै.सोपान विश्वनाथ लावंडे यांचे कायदेशीर वारस आहेत. या त्यांच्या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकत / हरकती द्यावयाच्या असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मा.न्यायालयात आपली हरकत / हरकती दाखल करावी.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदर कामी वारसाचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.०१/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# पनवेल महानगरपालिका
## जाहीर प्रगटन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५, २०६ व २०९ अन्वये
जा.क्र.पमपा/नरवि/Missing Links/२६-२१/प्र.क्र.०७/२४६६/२०२१, दिनांक ०३/१२/२०२१

ज्याअर्थी अंबरनाथ-कुळगांव, बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राची विकास योजना शासनाचे नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीएस-१२०४/९४१/सीआर-१६३/०४/नवि-१२ दि.२५ जुलै २००५ अन्वये शासनाने मंजूर केली आहे आणि उक्त विकास योजना दि.१२ ऑगस्ट २००५ पासून अंमलांत आलेली आहे (यात यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त एम.एम.आर.डी.ए. विकास योजना'' असा करण्यात आला आहे.)

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त अधिनियम'' असा करण्यात आला आहे) चे कलम ११३ (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासनाने नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी.११७१/१८१२४/११३/आय डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ द्वारे, यात नमूद करण्यात आलेले क्षेत्र हे नवी मुंबई ह्या नवीन नगराचे क्षेत्र म्हणून घोषित केले आहे व सिडकोस नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी. १८१२४/II डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ अन्वये, उक्त अधिनियमांच्या कलम ११३ (३ अ) नुसार नवी मुंबई या नवीन नगर क्षेत्रासाठी (उक्त नवनगरक्षेत्र) नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासनाने उक्त नवनगर क्षेत्रासाठी सिडकोने सादर केलेल्या रचनाबद्ध आराखड्याच्या (Structural Plan) स्वरुपात असलेल्या प्रारुप विकास योजनेस (उक्त अंतिम विकास योजना) नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/युडी-५, दिनांकास १८ ऑगस्ट १९७९ सह अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/युडी-५, दिनांक १८ जानेवारी १९८० अन्वये मंजूरी दिलेली आहे आणि उक्त विकास योजना दिनांक १ मार्च १९८० पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त महानगरपालिका अधिनियम'' असा करण्यात आला आहे) चे कलम ३ च्या पोट कलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पनप-२९१४/व्ही आय पी. सं.क्र.३०१/प्र.क्र.३५४/नवि-२३, दि.२६ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसूली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनांक १ ऑक्टोबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये उक्त एम.एम.आर.डी.ए. विकास योजनेतील ११ महसूली गावांचा समावेश पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत करण्यात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अंतिम विकास योजना व उक्त मंजूर एम.एम.आर.डी.ए. विकास योजना या एकमेकांना लागून आहेत आणि मंजूर विकास योजनेतील रस्ते उक्त मंजूर एम.एम.आर.डी.ए. विकास योजनेच्या हद्दीपर्यंत तयार करण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अंतिम विकास योजना व उक्त मंजूर एम.एम.आर.डी.ए. विकास योजनामध्ये Missing Links असल्याने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक सोयीची व दळण वळण सुकर होण्यासाठी नवीन जोड रस्ते तयार करणे गरजेचे आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगपालिका अधिनियमांचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये नवीन रस्ते तयार करणे, रस्त्याची रुंदी निश्चित करणे व रस्त्यांची सुधारणा करणेचा अधिकार महानगरपालिकेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये नवीन रस्ते तयार करणे, रस्त्याची रुंदी निश्चित करणे व रस्त्यांची सुधारणा करणेकरिता पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१९० दि.०५/०९/२०१९ अन्वये आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेल्या खारघर नोडमधील व्हॅली शिल्प निवासी संकुलासमोरील सिडकोने विकसित केलेला विद्यमान ३५.०० मी. रुंदीच्या रस्त्याला पुढे मौजे अडीवली-किरवली या महसूली गावांच्या स.नं.८९ (पैकी) च्या पूर्वकडील हद्दीपर्यंत विद्यमान राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा ३५.०० मी. रुंदीचा सार्वजनिक रस्ता आखणे आणि प्रस्तावित Missing Links ला वा उक्त मंजूर एम.एम.आर.डी.ए. विकास योजनेतील २४.०० मी. रुंदीच्या रस्त्याला जोडणारा बीड महसूली गावाच्या स.नं.४२ पासून ते मौजे रोहिंजण या महसूली गावाच्या स.नं.१०९ पर्यंतच्या २४.०० मी. रुंदीचा सार्वजनिक रस्ता आखणे व तयार करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये या कार्यालयाचे जाहीर प्रकट क्रमांक/नरवि/ससंनर/Missing Links/४०५/२०२०, दि.१०/०२/२०२० अन्वये महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्र क्र.२०, दि.११/०२/२०२० व दि.१२/०२/२०२० च्या दै.लोकसत्ता, दै.रामप्रहर, दै.कर्नाळा व दै.लोकमत या वृत्तपत्रात प्रसिद्धी देवून वरील प्रकटन शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नागरिकांकडून हरकती व सुचना मागविण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, वरील रस्त्याच्या आखणीबाबत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती व सुचनाबाबत दिनांक १७/११/२०२० ते २८/१२/२०२० या कालावधीमध्ये सुनावणी घेण्यात येवून संबंधित हरकती / सुचना धारकांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील सदरच्या नवीन सार्वजनिक रस्त्याचे संरेखांकन आखणी करण्यास संबंधित हरकती / सूचना धारकांपैकी बहुतांश धारकांनी सहमती दर्शविली असून त्यापैकी काहींनी रस्त्याच्या आखणीमध्ये किरकोळ बदल करून आखणी करण्याबाबत सूचना केली आहे;

आणि ज्याअर्थी, सदरच्या नवीन सार्वजनिक संरेखांकन आखणीमध्ये किरकोळ बदल करून रस्त्याची आणखी करण्यास अंतिम मान्यता देण्यात आली आहे;

त्याअर्थी, मी गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका मला प्राप्त अधिकारांन्वये खालील परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नवीन जोड रस्त्याची आखणी व परिशिष्ट 'ब' मध्ये नकाशात दर्शविल्या प्रमाणे रस्त्याचे संरेखांकन मंजूर करीत आहे. सदर परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' च्या प्रति नागरिकांच्या पाहणी करिता सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यांच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/१२/२०२१

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## परिशिष्ट-अ
## रस्त्याचे संक्षिप्त विवरण

खारघर नोडमधील व्हॅली शिल्प निवासी संकुला समोरील सिडकोने विकसित केलेला विद्यमान ३५.०० मी. रुंदीच्या रस्त्याला पुढे मौजे आडिवली-किरवली या महसूली गावांच्या स.नं.८९ (पैकी) च्या पुर्वेकडील हद्दीपर्यंत विद्यमान राष्ट्रीय महामार्गाला (NH-4) जोडणारा ३५.०० मी. रुंदीचा सार्वजनिक रस्ता आखणे व तयार करणे. आणि, प्रस्तावित Missing Link ला व एम.एम.आर.डी.या AKBSNA च्या मंजूर विकास आराखड्यामध्ये दर्शविलेला २४ मी. रुंदीच्या रस्त्याला जोडणारा, मौजे : बीड महसूली गावाच्या स.नं.४२ पासून ते मौजे : रोहिंजण या महसूली गावाच्या स.नं.१०९ पर्यंतच्या २४ मीटर रुंदीचा प्रस्तावित रस्ता.

प्रस्तावित रस्त्याचे संरेखांकनामुळे बाधित होणारे सर्व्हे नं./गट नं. खालीलप्रमाणे आहेत.

| अनु क्र. | महसूली गावे व त्यातील सर्व्हे नं. |
|---|---|
| १ | **मौजे : बीड :-** **३९ (पैकी), ४१ (पैकी), ४२ (पैकी), ४३ (पैकी), ४४ (पैकी) ४५ (पैकी), ६१ (पैकी), १ (पैकी), ३ (पैकी), ७ (पैकी), ८ (पैकी), १२ (पैकी), १३ (पैकी), १४ (पैकी), १५ (पैकी), १६ (पैकी), ६७ (पैकी), ३१ (पैकी), ३२ (पैकी), ३३ (पैकी), ३४ (पैकी)** |
| २ | **मौजे : आडिवली :-** **४२ (पैकी), ४३ (पैकी), ४४ (पैकी), ४५ (पैकी), ४६ (पैकी), ८४ (पैकी), ८६ (पैकी), ३ (पैकी), ५ (पैकी), ६ (पैकी)** |
| ३ | **मौजे : किरवली :-** **८९ (पैकी)** |
| ४ | **मौजे : रोहिंजण :-** **१०५ (पैकी), १०६ (पैकी), १०७ (पैकी), १०९ (पैकी), ११० (पैकी), ११४ (पैकी)** |

टिप :- या व्यतिरिक्त प्रत्यक्ष जागेवर मोजणी करताना अस्तित्वातील सर्व्हे नं. यांचाही समोवश असेल.

## परिशिष्ट-ब

प्रस्तावित दोन्ही रस्त्याचे अंतिम व मंजूर संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या पाहणी करिता सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात खुला ठेवण्यात आलेला आहे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/१२/२०२१

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# PANVEL MUNICIPAL CORPORATION
## Public Notice

Maharashtra Municipal Corporation Act, 1949 Section 205, 206 & 209 No. PMC/TPD/Missing Links/26-21/C.N 07/2466/2021, Date 03/12/2021

Whereas the Ambarnath, Kulgaon Badlapur & Surrounding Notified area Development Plan has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department vide notification no. TPS - 1204/941/CR - 1630/UD -12, dated 25 July 2005 and it has come into force with effect from 12th August 2005 (hereinafter referred as the said MMRDA Development Plan);

And whereas, the Govt., in exercise of the powers conferred by Section 113(1) of the Maharashtra Regoonal and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "said Act") has designated site for New - Town of Navi Mumbai (hereinafter referred to as "Said New Town") vide Urban Development and Public Health Department's (UD and PH) Notification No. RPB. 1171/18124/I.W., dated the 20th March 1971 and CIDCO has been appointed as New Town Department Authority (NTDA) for the said New Town Under Section 113(3A) of the said Act vide Urban Development and Public Health Department's Notification No. RPB. 117/18124/II.W., dated the 20th March 1971;

And whereas, the Govt, in, exercise of the Powers conferred by Section 31(1) of the said Act vide UD and PHD's Notification No. RPB. 1175/635/UD-5, dated the 18th January 1980 has been sanctioned the Draft Development Plan (hereinafter referred to as "said Final Development Plan") in the form of structural plan submitted by CIDCO for the said New Town area and the said Final Development Plan came into force with effect from 1st March 1980;

And whereas, the Government in exercise of the power conferred by Section 3 of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949 (hereinafter referred to as the "said MMC Act") vide the Urban Development Department notification no. PNP.2014/VIP No. 301/CR. 354/UD/23 dated the 25th September, 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of erstwhile Panvel Municipal Council &29 revenue villages specified therein, which came into force with effect from 1st October 2016;

And whereas; the said MMRDA Development Plan's 11 revenue villages has been included in the Panvel Municipal Corporation Area;

And whereas, the said Final Development Plan & said MMRDA Development Plan are adjacent to each other and the roads are already developed in the said Final Development plan are up to the said MMRDA Development Plan limit;

And whereas, there are Missing links between the said Final Development Plan &the said MMRDA Development Plan it has become expedient to connect the Missing Links by preparing new roads so as to enable the traffic Smoothly & to make the conveniently traffic within the Panvel Municipal Corporation;

And whereas, as per the provisions of the said MMC Act, Sections 205, 206, & 209 empowers the Municipal Corporation to prepare the new roads, to decide the width of the roads and to improve the roads within the Municipal Corporation Area;

And whereas, the Panvel Municipal Corporation vide General Body Resolution no. 190 dated 05/09/2019 delegated the powers of Section 205, 206 & 209 of the said MMC Act to Commissioner, Panvel Municipal Corporation;

And whereas, Panvel Municipal Corporation has published the Notice vide No. PMC/TPD/ADTP/Missing Links/405/2020, dated 10th February 2020 in Maharashtra Government Extra-Ordinary Gazette No. 20, dated 11th February 2020 and published in Daily Lokamat, Daily Loksatta, Daily Ramprahar and Daily Kanala newspapers on 12th February 2020 for inviting suggestions and objections to the said proposed draft alignment of New Public Road for Connection of Missing Links by preparing the new road extending from existing 35 m wide road in the Kharghar Node abutting Valley Shilp Residential Complex to be extended upto the Eastern boundary of S.No.89 of Adiwali - Kirawali revenue village as well as connecting to Mumbai - Pune National Highway No.4 and 24 m wide road connecting proposed missing link and 24 m wide D.P. Road as shown in sanction MMRDA AKBSNA plan from S.No.42 of Beed revenue village to S.No.109 of Rohinjan village as shown in the Annexure 'A' and Annexure 'B' with the provisions contained in the sections 205, 206 and 209 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 from the public thereof within 30 days from the date of publication of the notice in Maharashtra Government Extra-Ordinary Gazette ;

And whereas, hearing regarding suggestions and objections received from public was held during the period of dtd. 17/11/2020 to dtd. 28/12/2021 and suggestions and objections have been noted and considered.;

And whereas, most of the concerned Persons have agreed for the proposed alignment of new public road and some of them suggested some minor correction In proposed alignment;

And whereas, proposed alignment of New Public Road has been sanctioned with some minor correction;

Therefore, as per the powers delegated by Panvel Municipal Corporation to the Commissioner, Panvel Municipal Corporation and in exercise of the powers, I, Ganesh Deshmukh, Commissioner, Panvel Municipal Corporation here by sanctions the alignment of proposed new road as mentioned in the Annexure 'A' and plan appended hereto Annexure 'B' showing the alignment of new road is kept open for the inspection of general public on all working days and in working hours in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation for a period of one month.

Panvel
Date : 03/12/2021

Sd/-
(Ganesh Deshmukh)
Commissioner
Panvel Municipal Corporation

## 'Annexure 'A'
## Description of Road

Connection of Missing Links by preparing the new road extending from existing 35 m wide road in the Kharghar Node abutting Valley Shllp Residential Complex to be extended upto the Eastern boundary of S.No.89 of Adiwali - Kirawali revenue village as well as connecting to Mumbai - Pune National Highway No.4 and 24 m wide road connecting proposed missing link and 24 m wide D.P. Road as shown in sanction MMRDA AKBSNA plan from S.No.42 of Beed revenue village to S.No.109 of Rohinjan village.

Details of S.No. of lands affected by the proposed alignment of the new road is as below.

| Sr. No. | Name of Revenue Village and Survey No. |
|---|---|
| 1 | Mouje Bid: - 39(Part), 41(Part), 42 (Part), 43(Part), 44(Part), 45(Part), 61(Part), 1 (Part), 3(Part), 7(Part), 8(Part) 12(Part), 13(Part), 14(Part), 15(Part), 16(Part), 67(Part), 31(Part), 32(Part), (33(Part), 34(Part). |
| 2 | Mouje Adivali: - 42(Part), 43(Part),44(Part), 45(Part), 46(Part), 84 (Part), 86 (Part), 3(Part), 5(Part), 6(Part), |
| 3 | Mouje Kirawli: - 89(Part). |
| 4 | Mouje Rohinjan: - 105(Part), 106(Part), 107(Part), 109(Part), 110(Part),114 (Part). |

Note:- other than above listed survey number, if any other survey number existed while laying out the road then it will also be the part of the above proposed road.

## 'Annexure 'B'

Plan showing proposed final & Sanctioned alignment of both roads is kept open for Inspection in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal

Sd/-
(Ganesh Deshmukh)
Commissioner
Panvel Municipal Corporation

# सर्व नियमांचे पालन करावे ; अफवांवर विश्वास ठेवू नये : विजय कादबाने



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाचे वेगवेगळे नियम जाहीर करण्यात येत आहेत. हे सर्वांना बंधनकारक असून त्याचे पालन सर्वांनी काटेकोरपणे करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सोशल मिडीयाद्वारे पसरविण्यात येणाऱ्या अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये अशा प्रकारच्या अफवा पसरविल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा ठोस इशारा पनवेल शहर पोलीस ठाण्याचे नवनिर्वाचित वपोनि विजय कादबाने यांनी आज घेतलेल्या शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीच्या बैठकीत दिला आहे.

या बैठकीला वपोनि विजय कादबाने, पो.उपनिरीक्षक महाडिक, गोपनिय विभागाचे शैलेश जाधव यांच्यासह शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे नगरसेवक मुकीद काझी, जुबेर पटेल, नाविद पटेल, अशफाक काझी, मुदसिर पटेल, जावेद पटेल, साजिद पटेल, रशिद शेख, रफिक शेख, मन्सुर पटेल, इम्रान पटेल आदी सदस्य उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना वपोनि विजय कादबाने यांनी सांगितले की, सर्वांनी एकोप्याने राहणे गरजेचे असून पनवेल शहर हे सर्वांना सामावून घेणारे शहर आहे. त्याला एक इतिहास आहे. त्यामुळे सर्व जाती धर्माचे लोक एकोप्याने सण, कार्यक्रम साजरे करतात. सध्या कोरोनाची लाट परत येण्यास सुरूवात झाली आहे. यावेळी याच्याविरुद्ध लढा देण्यासाठी सुद्धा सर्वांनी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जशी मदत लागेल त्याप्रकारची मदत इतरांना करायची आहे. कोणीही अफवा पसरवू नये, या संदर्भात त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सुद्धा त्यांनी केले आहे.

# वावे गावातील अंतर्गत रस्ते होणार चकाचक

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

ग्रुप ग्रामपंचायत रासळ तर्फे वावे गावातील अंतर्गत मुख्य रास्ता ते विकास आळी आणि वावे गाव तर्फे हवेली येथे शुक्रवारी (ता.३) पेव्हर ब्लॉक रस्त्याच्या कामाचे मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी लगेचच कामाची सुरुवात देखील करण्यात आली आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य धनंजय म्हसके, अलंकार रायकर, मंगेश म्हसके यांच्यासह गोपाळ हिर्डेकर, विजय म्हसके, नरेश सकपाळ, तुषार शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते. रासळ ग्रामपंचायत करत असलेल्या विविध विकास कामांचे ग्रामस्थांनी यावेळी कौतुक केले.

# भूमिपूत्रांना रोजगारासाठी शंभर टक्के सहकार्य करणार : नरेश चाळके



**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर इंडस्ट्रीज असून त्यात स्थानिक भूमिपूत्रांना रोजगार मिळाला पाहिजे आणि त्यासाठी शंभर टक्के सहकार्य करू, असे आश्वासन शिवसेना अवजड वाहतूक सेना प्रदेश सचिव नरेशभाई चाळके यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष इंद्रजीत बल यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या शिवसेना अवजड वाहतूक सेनेची बैठक आज वडगांव जिल्हा परिषद विभागात आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवसेना अवजड वाहतूक सेना महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष संदीप बाबू मोरे, प्रदेश सचिव नरेशभाई चाळके, प्रदेश उपसचिव अल्ताफ मंसुरी, उपसचिव संदेश क्षिरसाठ, पुणे जिल्हाध्यक्ष हेमंत मेणे, पराग राणे, वडगांव जिल्हा परिषद विभाग प्रमुख सुनील थोरवे, रायगड जिल्हा सचिव श्रीधन वझरकर, खालापूर-कर्जत विधानसभा सचिव संजय साबळे, रवि तिवारी, इसांबे विभाग प्रमुख समीर देवघरे, युवा सेना विभाग प्रमुख सोमनाथ देवघरे, मा. ग्राम पंचायत सदस्य सतिश महाब्दी, सामाजिक कार्यकर्ते सुनील पवार, वानिवली शाखा प्रमुख रमेश कनोजे, मा. सदस्य इसांबे भरत हिलम, पांडुरंग कनोजे, ज्ञानेश्वर कनोजे, धानू कनोजे, संजय थोरवे आदी उपस्थित होते.

वडगांव जिल्हा परिषद विभाग प्रमुख सुनील थोरवे यांनी स्थानिकांच्या रोजीरोटीचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करतानाच ट्रान्सपोर्ट किंवा अन्य माध्यमातून प्रयत्न करावेत, असे सांगितले असता. नरेशभाई चाळके म्हणाले की, आपण आपल्या जमिनी इंडस्ट्रीजला देत असतो, त्यामुळे इंडस्ट्रीजमध्ये स्थानिक भूमिपूत्रांना रोजगारासाठी शंभर टक्के संधी दिली गेली पाहिजे व त्यासाठी शंभर टक्के सहकार्य करणार, असे त्यांनी सांगितले.

शिवसेना अवजड वाहतूक सेनेची रायगड जिल्हा व खालापूर तालुक्यात कार्यकारिणी बांधणीचे काम सुरू असून त्याच अनुषंगाने आज प्रदेश उपसचिव अल्ताफ मंसुरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संघटन बांधणीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच सभासद नोंदणीबाबत प्रदेश कार्यकारिणी समोर माहिती देण्यात आली.